नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः शाकाजा-१११५/प्र.क्र.१३३/२०१५/२२

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
तारीख: ०९ जानेवारी, २०१८

प्रस्तावना :

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई हे कार्यालय सध्या शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, वरळी, मुंबई येथे ४००० चौ.फूट जागेत कार्यरत आहे. सदर जागा मंजूर, कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना अपुरी पडत असल्यामुळे त्या जागेशेजारील त्यांच्या वापरात असलेली १८१८.६५ चौ.फूट मोकळी जागा + DAYNULM या केंद्र शासन योजनेच्या कक्षासाठी मागणी केलेली ४९४.०९ चौ.फूट अशी एकूण २३१२.७५ चौ.फूट एवढी जागा नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई या कार्यालयास वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय:

शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, वरळी, मुंबई येथील नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई या कार्यालयाच्या ताब्यातील ४००० चौ.फूट जागे शेजारील त्यांच्या वापरात असलेली १८१८.६५ चौ.फूट मोकळी जागा + DAYNULM या केंद्र शासन योजनेच्या कक्षासाठी मागणी केलेली ४९४.०९ चौ.फूट अशी एकूण २३१२.७५ चौ.फूट एवढी जागा नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई या कार्यालयास वाटप करण्यात येत आहे. त्यामुळे शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, वरळी, मुंबई येथील कार्यरत संचालनालयाच्या ताब्यातील ४००० चौ.फू. जागा व त्या जागेशेजारील २३१२.७५ चौ.फू. अशी एकूण ६३१२.७५ चौ.फुट जागा नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई या कार्यालयास वाटप करण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई यांनी उपरोक्त जागेचा ताबा नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना द्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. जागेचा ताबा देतेवळी सार्वजनिक स्वच्छतागृहासाठी तसेच इतर कार्यालयासाठी पोच रस्ता पुरेसा राहील याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०९१६२८१५५९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradnya Prakash Sawant

Digitally signed by Pradnya Prakash Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dcab5c13648ccfdd9424ee4584da4e72f3f6f06dfd6b1eaa220fc9de68f36473, cn=Pradnya Prakash Sawant
Date: 2018.01.10 11:46:16 +05'30'

(प्र. प्र. सावंत)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य
३. मा.मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई-४०० ०३०.
८. सामान्य प्रशासन विभाग/का.२१(आस्था)/का.२१ रोख/का.२४, का.३१, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०१८.
१२. उप अभियंता, मध्य उप विभाग, सा.बां.वि., मंत्रालय, मुंबई.
१३. वाणिज्य अधिकारी, शीघ्र ग्राहक सेवा (Q.C.S.), महानगर टेलिफोन निगम लि., कुपरेज दूरध्वनी एक्सेंज, मुंबई.
१४. कनिष्ठ अभियंता, महानगर टेलिफोन निगम लि, मंत्रालय दुरध्वनी सेवा केंद्र, मंत्रालय-३२.
१५. मुख्य दूरध्वनी चालिका, मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनस्ती / कार्या.२२.